पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ४७ वा | शुक्रवार, दि. ०४ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# 12 सप्टेंबरला गुलाल मुख्यमंत्र्यांवर टाकू, पण...,जरांगेंची माघार नाहीच !

## मनोज जरांगेंना मोठं यश, 5 अटी मान्य

**अंतरवली सराटी (कटूसत्य वृत्त):-** मराठा आरक्षणासाठी 29 ऑगस्टपासून आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीला आज राज्य सरकारचं शिष्टमंडळ आंतरवाली सराटी येथे दाखल झाले आहे. राज्य सरकारकडून आज जरांगे राज्याचे मंत्री विखे पाटील, उदय सामंत आणि प्रसाद लाडसह मकरंद आबा पाटील यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी 10 तारखेला मराठा समाजाला दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्राविषयी शासन निर्णय काढणार असल्याची घोषणा केली.



**दुसरी मागणी :** विखे पाटील यांनी म्हटले की, मुलांच्या फी बाबत सरकार सकारात्मक आहे.

कोणत्याही मुलाचे शैक्षणिक आणि आर्थिक नुकसान होऊ देणार नाही. जात पडताळणी प्रमाणपत्र नसल्यास फी भरावी लागली त्यांना पैसे परत दिले जातील.

**तिसरी मागणी :** सरकारने प्रत्येक महिन्यात शिबिर घेऊन युद्धपातळीवर काम करण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहितीही सरकारच्या शिष्टमंडळाने दिली आहे.

**चौथी मागणी :** मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक नोडल ऑफिसर असणार आहे अशी माहितीही सरकारकडून देण्यात आली आहे.

**पाचवी मागणी :** मराठा समाजाच्या नोंदी शोधणारी शिंदे समिती संपूर्ण मराठवाड्यात दौरा करणार असल्याची माहितीही सरकारी शिष्टमंडळाने दिली आहे.

यावेळी 30 लाख लोकांना डिजिटल प्रमाणपत्रं दिली असल्याची माहिती उदय सामंतयांनी दिली. तर 58 लाख नोंदींची प्रमाणपत्रं डिजिटाईज करा अशी मागणी यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी केली. तर अर्ज करतील त्यांना ग्रामपंचायत पातळीवर प्रमाणपत्रं मिळणार असल्याची माहिती मंत्री विखे पाटील यांनी मनोज जरांगेंना दिली. 5 सप्टेंबरपर्यंत ग्रामपंचायत पातळीवर कुणबी नोंदी केल्या जाणार असल्याची देखील माहिती विखे पाटील यांनी दिली. हैदराबाद गॅझेटनुसार कुणबी प्रमाणपत्र कधी देणार असा प्रश्न देखील जरांगे पाटील यांनी यावेळी राज्य सरकारच्या शिष्टमंडळाला विचारले. तसेच शिंदे समितीने 58 लाख नोंदी शोधल्या होत्या. कुणबी प्रमाणपत्रासाठी उद्यापासून अर्ज करण्याचे मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला आवाहन केले आहे. प्रमाणपत्रासाठी नातं रक्ताचं नातं आणि कुळ तपासून अर्ज करा. सरकारच्या नियमावलीनुसार वंशावळ ग्राह्य धरली जात नाही असं देखील यावेळी जरांगे म्हणाले. तर आरक्षणाच्या शासन निर्णयात मुख्यमंत्र्यांच्या बैठकीनंतर बदल शक्य आहे असं यावेळी मंत्री विखे पाटील म्हणाले. तसेच कुणबी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यात काही अडचणी आल्या तर जिल्हाधिकाऱ्यांना भेटण्याचे आवाहनही विखे पाटील यांनी केले.

यावेळी सरकारने अनेक मागण्या मान्य केल्या असल्याचं सांगितलं. तसंच, १० सप्टेंबरला जीआर काढणार असं आश्वासनही दिलं. पण, मनोज जरांगेंनी "मला शेवटचं आंदोलन करायचं आहे', असं म्हणत उपोषण सोडण्यासाठी नकार दिला आहे. जरांगे यांनी १० सप्टेंबरपर्यंत जीआर काढण्यात अडचण काय आहे, असा सवाल उपस्थितीत करत आंदोलन मागे घेण्यास नकार दिला. ११ सप्टेंबरपर्यंत तुम्ही सगळ्या मागण्या मान्य करा, आम्ही १२ सप्टेंबरला गुलाल घेऊन मुंबईला येऊ असं म्हणत जरांगेंनी आंदोलन मागे घेण्यास नकार दिला.

**प्रमाणपत्रासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी**


तर कुणबी प्रमाणपत्रासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी नोडल अधिकारी असणार असल्याची माहिती मंत्री मकरंद पाटील यांनी दिली. हैदराबाद गॅझेटनुसार जात पडताळणी प्रमाणपत्रं कसं देणार असा प्रश्न जरांगे यांनी विचारल्यानंतर हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्र देण्यात येत असल्याचा दावा सरकारकडून करण्यात आला. मात्र सर्व मागण्या मान्य झाल्या तरच आंदोलन थांबवणार अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतल्याने उपोषणाच्या सहाव्या दिवशी मनोज जरांगे पाटील उपोषण सोडणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.











## संपादकीय

# सदसद्विवेकबुद्धीचा अभाव की सत्तेचा माज?

पुण्यात आवाज उठविणाऱ्यांवर हल्ले आणि कारवाई होत असेल, तर लोकशाही नेमकी कुठे उरली?

पुणे! महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक चळवळींचे केंद्र. लोकमान्य टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा याच शहराने देशाला दिली. विचारांची देवाणघेवाण, सामाजिक प्रश्नांवर चर्चा आणि अन्यायाविरोधात आवाज उठविण्याची संस्कृती पुण्याच्या मातीत रुजली. मात्र, गेल्या काही तासांतील दोन घटनांनी याच पुण्याच्या लोकशाही संस्कृतीसमोर गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

गणेशोत्सवातील डीजे आणि ध्वनिप्रदूषणाच्या प्रश्नावर भूमिका मांडणारे विद्यानंद बापट यांच्यावर भरदिवसा माध्यमांना मुलाखत देताना मारहाण करून हल्ला केला आहे. दुसरीकडे, जनसामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठविणारे सामाजिक कार्यकर्ते व यूट्यूबर संतोष पंडित यांना रात्री पोलिसांनी घरातून अटक केली जात आहे. या दोन्ही घटनांकडे वेगवेगळ्या चौकटीत पाहण्यापेक्षा त्यामागील लोकशाही मूल्यांचा प्रश्न समजून घेणे गरजेचे आहे.

मत पटले नाही म्हणून हात उचलायचा आणि प्रश्न पटला नाही म्हणून आवाज दाबायचा, ही कोणती लोकशाही?

विद्यानंद बापट यांची डीजेसंदर्भातील भूमिका योग्य आहे की अयोग्य, यावर मतभेद असू शकतात. गणेशोत्सवातील जल्लोषाला महत्त्व देणाऱ्यांचीही भूमिका असू शकते आणि ध्वनिप्रदूषणामुळे त्रास होणाऱ्या नागरिकांचीही. पण लोकशाहीचे सौंदर्य याच्यामध्ये आहे की परस्परविरोधी मतांना एकाच समाजात स्थान असते.

बापट यांचे म्हणणे चुकीचे वाटत असेल, तर त्यांना आकडेवारीने, कायद्याने आणि तर्काने उत्तर देता आले असते. त्यांची सार्वजनिक चर्चा करता आली असती. त्यांची भूमिका खोडून काढणारे स्वतंत्र मत मांडता आले असते. पण विचाराला उत्तर म्हणून मारहाण केली जात असेल, तर ती केवळ एका व्यक्तीवरील हिंसा राहत नाही; ती अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावरची गदा ठरते.

आज प्रश्न डीजेचा आहे; उद्या तो रस्त्याचा, पाण्याचा, महागाईचा, भ्रष्टाचाराचा किंवा प्रशासनाच्या निर्णयाचा असू शकतो. प्रत्येक वेळी प्रश्न विचारणाऱ्याला धमकावले, मारहाण केली किंवा कायद्याचा धाक दाखवून गप्प केले, तर सामान्य नागरिकांनी आवाज उठवायचा तरी कसा?

याहून गंभीर प्रश्न संतोष पंडित यांच्या अटकेच्या कथित घटनेबाबत उपस्थित होतो. जर एखाद्या नागरिकाला केवळ सत्तेतील व्यक्ती किंवा मंत्र्यांच्या विरोधात भूमिका मांडल्यामुळे कारवाईला सामोरे जावे लागत असेल, तर त्या कारवाईमागील नेमके कायदेशीर कारण काय आहे, हे प्रशासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. सत्ता ही प्रश्न विचारणाऱ्यांना घाबरविण्यासाठी नसते; उलट प्रश्न विचारण्याचा अधिकार अधिक बळकट करण्यासाठी असते.

मात्र येथे एक महत्त्वाची बाब स्पष्ट असली पाहिजे. आरोप झाले म्हणजे दोष सिद्ध झाला असे होत नाही. बापट यांच्यावर झालेल्या कथित हल्ल्याची तसेच पंडित यांच्या अटकेची पोलिसांनी निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणली पाहिजे. कोणताही राजकीय पक्ष, नेता, कार्यकर्ता किंवा सामाजिक गट कायद्यापेक्षा मोठा असू शकत नाही.

गणेशोत्सव हा कोणत्याही एका गटाची मक्तेदारी नाही. तो संपूर्ण समाजाचा उत्सव आहे. त्यामुळे उत्सवाचा आनंद घेण्याचा अधिकार जितका महत्त्वाचा आहे, तितकाच ध्वनिप्रदूषणापासून त्रासमुक्त वातावरणात जगण्याचा अधिकारही महत्त्वाचा आहे. दोन्ही बाजूंनी कायद्याचा सन्मान केला पाहिजे. डीजेच्या बाजूने असणाऱ्यांनीही नियम पाळले पाहिजेत आणि विरोध करणाऱ्यांनीही संवादाचा मार्ग स्वीकारला पाहिजे.

गुंडगिरीला गणेशोत्सवाचे संरक्षण देता येणार नाही आणि प्रशासनाच्या कारवाईला राजकीय सूडाचे स्वरूपही देता येणार नाही.

पोलिस प्रशासनाची भूमिका या संपूर्ण प्रकरणात अत्यंत महत्त्वाची आहे. कायदा मोडणारा कोणत्याही पक्षाचा असो किंवा कोणत्याही विचारसरणीचा त्याच्यावर समान कायदा लागू झाला पाहिजे. बापट यांच्यावर हल्ला झाला असल्यास हल्लेखोरांवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. त्याचप्रमाणे संतोष पंडित यांच्यावरील कारवाई कायदेशीर प्रक्रियेनुसार झाली असेल, तर त्याचे कारण आणि आधारही स्पष्टपणे समोर आला पाहिजे.

कारण लोकशाहीत पारदर्शकता हीच प्रशासनाची खरी ताकद असते. पुण्यासारख्या वैचारिक शहरात एखाद्याला आपले मत मांडण्यापूर्वी 'आपल्यावर हल्ला होईल का?' किंवा 'आपल्यावर गुन्हा दाखल होईल का?' असा विचार करावा लागला, तर ही परिस्थिती चिंताजनक आहे. मतभेद संपविण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे समोरच्याचा आवाज बंद करणे; पण तो लोकशाहीचा मार्ग नाही.

सत्तेचा खरा कस विरोधकांना गप्प करण्यात नसतो; तर विरोधी मत ऐकून घेण्याच्या क्षमतेत असतो.

म्हणूनच या घटनांवरून पुणेकरांनी आणि प्रशासनाने एकच प्रश्न विचारला पाहिजे. आपण मतभेदांच्या संस्कृतीकडे चाललो आहोत की गुद्देशाहीच्या?

उत्तर आजच ठरवावे लागेल. कारण अन्यायाविरुद्ध बोलणाऱ्याचा आवाज आज दाबला, तर उद्या आपल्या प्रश्नाचा आवाज दाबला जाऊ शकतो.

विचारांना विचारांनी उत्तर द्या.
आरोपांना पुराव्यांनी उत्तर द्या.
मतभेदांना संवादाने सामोरे जा.
पण गुंडगिरीला आणि दहशतीला लोकशाहीच्या नावाखाली कधीही मान्यता देऊ नका!

पुण्याची ओळख गुद्देशाहीने नव्हे, तर विचारांच्या लढाईने झाली आहे. ती ओळख जपण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांइतकीच नागरिकांची आणि प्रशासनाचीही आहे.

*मैं उस घरमें दिया*
*जलाने जा रहा हूँ।*
*जिस घरमें सदियोंसे अंधेरा है।*

असे उद्गार माणूसकीचा पुरस्कार करीत काढले आहेत. मानवतेचे पुजारी माजी खा.ना. सुशिलकुमारजी शिंदे साहेब यांनी लोककल्याणाचा वसा घेतलेले रक्ताच्या पाटातून एकता नव्हें तर स्नेहाच्या लाटातून समता निर्माण होते. ममता असल्याशिवाय समता निर्माण होऊ शकत नाही हे तत्वज्ञान, समतेचे समर्थ शिलेदार माजी खा.सुशिलकुमारजी शिंदे यांचे आहे. सिध्वरामेश्वराच्या पदस्पर्शेने पुनीत झालेल्या, राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन आत्मबलिदान केलेल्या, हुतात्म्याचा बलिदानाने पावन झालेल्या या हुतात्मा पुण्यनगरीचे सुपुत्राच्या ८६ व्या वाढदिवसा निमित्त शब्दसुमने गुंफविण्याची संधी मिळाली माझ्या सारख्या लहान कार्यकर्तीला सामन्यामधुन असामान्य बनलेले, बहुजन हिताय, बहुजन सुखाय अशा ध्येयाने प्रेरित झालेले, सोलापूकरांना जाणवलेले, भावलेले, सोलापूरकरांच्या हृदयसिंहासनावर आरुढ झालेले, सोलापूरकरांच्या मनांत नितांत आदराचे स्थान निर्माण केलेले, सुशिलकुमारजी शिंदे साहेबांच्या कर्तुत्वाचा सुगंध परिजातकासारखा आहे, समाजाच्या सेवेचे आर्त आहे. कर्तव्य वचनपूतीर्ची निश्चिती आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ज्ञाननिष्ठा आहे. ज्यांनी सत्यम शिवम सुदंरमब, नित्य जापून शारदेच्या मंदिरात विधेची तार छेडली, ज्ञानोपसना केली. आणि परमोच्च कोटीला पोहोचले. त्यांनी आपले सारे जीवन समाजसेवेसाठी अग्निहोत्रा प्रमाणे तेवत ठेवले. त्यांच्या दृढ संकल्पनेतून साकार झालेल्या रोपटयाचे वृक्षात रुपांतर झाले आणि या वृक्षाचे रुपांतर बोधिवृक्षात झाला म्हणूनच दलित मागासवर्गीय कुटूंबात जन्मलेले ना. सुशिलकुमारजी शिंदेजी सत्कारास पात्र ठरले.

सुशिलकुमारजी हे रविकिरणाच्या प्रकाशाने तेजपुःज झालेले विचार आणि आचाराचे गरुडझेप घेऊन कांचनमनी योग साधून जनसेवा करणारे सुशिलकुमारजींच्या परिस स्पशार्ने सोलापूर वासियांचे सोन्यात रुपांतर झाले म्हणूनच मांगल्याच्या दिपाप्रमाणे तेवत असलेली सुशिलकुमारजींची मुर्ती ही सातासमुद्रापलिकडे किर्ती झाली.

अशा या अजातशत्रू सुशिलकुमार संभाजीराव शिंदे यांचा जन्म ४ सप्टेंबर १९४१, त्यांचे शिक्षण बी.ए. (ऑनर्स) एल. एल. बी. असे असून सोलापूर येथील संगमेश्वर आणि दयानंद महाविद्यालय आणि मुंबई येथील न्यू लॉ कॉलेज यांचे ते विद्यार्थी आहेत. वयाच्या १६ व्या वषार्पासून जीवन संघर्ष सुरु झाला. रात्र शाळेत शिकतांना न्यायालयात पट्टेवाला म्हणूनही काम केले. रात्रशाळेतून शिकून कॉलेजमध्ये प्रवेश केला सकाळी कॉलेज संपल्यानंतर नोकरी व राहिलेला वेळ अभ्यास असा त्यांचा दिनक्रम होता. विशेष प्रविण्यासह बी.ए. व नंतर कायद्याची पदवी त्यांनी संपादन केली विलक्षण जिद्द आणि अथक परिश्रम करण्याची तयारी या गुणांच्या जोरावर त्यांनी सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल केली. अभिनयाची आवड असल्याने अनेक नाटकातून कामे केली. नाटकात काम करतांना १९६१ साली सुशिलकुमार हे नांव धारण केले. मुंबई पोलीसांच्या गुप्तचर विभागात ते सब ईन्स्पेक्टर झाले. एक उमदे आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व,मृदु भाषा सर्वांशी मिळून मिसळून वागण्याची वृत्ती, सार्वजनिक क्षेत्रात काम करण्याची मनस्वी आवड यामुळे त्यांचा जनसंपर्क वाढतच गेला. त्यांना राजकीय क्षेत्रात प्रवेशाची संधी मिळाली त्यांनी १ मे १९७० रोजी उज्वला वहिनीशी विवाह केला. व १९७१ मध्ये नोकरीचा राजीनामा देऊन राजकारणात प्रवेश केला. कॉंग्रेस फोरम फॉर सोशालिस्ट ॲक्शनचे निमंत्रक म्हणून कामाला सुरुवात केली.

२३ एप्रिल १९७४ करमाळा विधानसभा पोटविनडणूकीत विजयी झाले आणि अनेक क्षेत्रातील व्यापक अनुभव त्यांना राजकिय क्षेत्रात उपयोगी ठरला. व विजयी घौडदौड सुरु झाली.

९ नोव्हेंबर १९७४ वसंतराव नाईक यांच्या मंत्रीमंडळाला राज्यमंत्री म्हणून वर्णी लागली.

१ मे १९७७ वसंतदादा मंत्रीमंडळात आरोग्य राज्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली.

२ ऑगस्ट १९७८ पुलोद सरकारमध्ये कॅबिनेट मंत्रीपदी शपथविधी झाला.

१९७९ जीनिव्हा आंतर राष्ट्रीय मजूर परिषदेत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्त्व केले.

१९८० पुलोद मधुन पुन्हा काँग्रेस मध्ये प्रवेश केला.

१९८३ वसंतदादांच्या मंत्रीमंडळात अर्थ खात्यासह पाच खात्याची जबाबदारी मिळाली.

१९८५ युनोच्या जनरल असेंब्लिमध्ये भाषण केले.

१९८६ शंकरराव चव्हाण यांच्या मंत्रीमंडळाला अर्थ व नियोजन खात्याचे मंत्री म्हणून काम सुरू केले.

१९८७ राज्याचा पहिला शुन्याधारित अर्थसंकल्प मांडला

१९८९ सलग नववा अर्थ संकल्प मांडून उच्चांक प्रस्थापित केला.

१९९२ अखिल भारतीय काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाल्यानंतर

१९९० काँग्रेसच्या महाराष्ट्राच्या प्रदेश अध्यक्षपदासाठी निवड झाली.

१२ राज्यांची जबाबदारी स्विकारली

१९९२ राज्य सभेवर निवड झाली.

१९९८ सोलापूर लोकसभा सर्वसाधारण मतदार संघातून निवडणूक जिंकली.

२००२ उपराष्ट्रपतीची निवडणूक लढविली.

१८ जानेवारी २००३ महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड १८ महिने मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले.


४ नोव्हेंबर २००४ आंध्र प्रदेशच्या राज्यपालपदी नियुक्ती झाली.

२९ जानेवारी २००६ केंद्रीय उर्जामंत्री म्हणून शपथविधी झाला

२००९ सोलापूर लोकसभा निवडणूकीत विजयी झाले.

२२ जून २००९ केंद्रीय उजार्मंत्री म्हणून दुसऱ्यांदा शपथ घेतली.

# द डेस्टिनि चाईल्ड



३१ जूलै २०१२ केंद्रीय गृहमंत्री आणि लोकसभेतील पक्षनेते पदी निवड जाहीर झाली.

पक्ष संघटनेतही मोलाची कामगिरी बजावली आहे. नेहरु गांधी घराण्यावर श्रध्दा व निष्ठा असून त्यांच्याशी एकनिष्ठ असलेले तीस देशांना भेटी दिल्या. संसदीय कामकाजाचा अनुभव दांडगा असल्याने त्यांच्या कायार्चा पारितोषिक देऊन गौरव मागास वगार्तील असूनही बाराव्या तेराव्या पंधराव्या लोकसभेवर सर्वसाधारण मतदारसंघातून अनुक्रमे १ लाख ४ हजार, ७२ हजार व १ लाखांचे मताधिक्य घेऊन निवडून येण्याचा विक्रम केला आहे. मुस्लीम व जैन समाजातील काही समाजांचा तसेच लोधी, गवळी, कुणबी, समाविष्ट मराठा आदी समाजांच्या इतर मागासवर्गीय समाजामध्ये समाविष्ट करण्यात आला त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या या घटकांना शासकीय सवलतींचा लाभ होत आहे.

भारतमातेच्या मुकाटातील कोंदणातील हिरा सोलापूरचे सुपुत्र मा. ना. शिंदे यांनी महाराष्ट्र राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर अनेक लोकाभिमुख निर्णय धडाडीने घेतले आहेत. ना. शिंदे यांच्या कारकिर्दीत मांडण्यात आलेला पहिलाच अर्थसंकल्प महाराष्ट्र राज्याच्या इतिहासातील आतापर्यंतच्या सगळ्यात चांगला अर्थसंकल्प असल्याचा निवाडा आर्थिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींनी दिला आहे. समाजातील दुर्बल व उपेक्षीत घटकांसाठी आग्रही पुढाकार घेऊन सामाजिक न्यायाला अग्रक्रम देण्यासाठी विविध योजना जाहीर केल्या या घटकातील नव्या पिढीची शैक्षणिक जडणघडण जोमाने व्हावी. या योजनांचा मुख्य उद्देश आहे.

गावोगावी हिंडणारे गावमागते, वासुदेव, भराडी, वैदू, कोल्हाटी, चित्रकथी, गोपाळ, गोंधळी, भोपे, भूते, मरगम्मावाले, किंम्प्रीवाले, मसणजोगी, कुडमुडे जोशी, माकडवाले, सापवाले, अस्वलवाले, मरी आईवाले, बंजारा, कैकाडी, वडार गावपारधी टकारी, कंजारभाट, रामोशी, छप्परबंर आदीवासी अशा कितीतरी लोकांना मानाचे पान दिले आहे. या सर्व उपेक्षितांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे फुले, शाहू, आंबेडकरांचे स्वप्न साकारण्यासाठी आणि पुर्नजागरण घडविण्याच्या कार्यास कटिबध्द झाले आहेत. सदरचे प्रयत्न अतिशय मोलाचे व महत्वाचे ठरले आहे. शिंदे साहेबांचा हसतमुख चेहरा बघितल्यावर असे म्हणावेसे वाटते की,

मेरे आँखो देखो यहाँ कोई
आईना नहीं ।
मेरे होटोंपे मुस्कराहट रखो,
यहाँ गम का खरीददार नहीं।

लोककल्यानाचा वसा घेतलेले व विकासाचे शिल्पकार, गोरगरिब जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आपली संपूर्ण शक्ती एकवटली आहे. सत्ता हे सेवेचे साधन आहे हे जाणून निष्ठापूर्वक आणि जिद्दीने सोलापूर क्षेत्रातील समस्यांचे त्यांनी निवारण केले आहे व विकासाची कास सातत्याने धरली आहेत. म्हणूनच म्हणावेसे वाटते की, गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सर्व प्रश्न त्यांनी सोडविले. अत्यंत नम्र व अबोलपणे ते अखंड सेवा कार्य करीत आहेत. सोलापूरच्या मातीशी इमान राखून विविध पदावर कार्य करणारे व आपल्या कर्तुत्वाने सोलापूरला भारताच्या नकाशात प्रकाशमय करणारे हे एकमेव नेता आहे. नेतृत्वातून देशसेवा, विकासातून प्रगती त्यांच्या कायार्तून उजळतो. शिंदेजी इतरांना उजळिवणारा एक नंदादिप आहे.

सोलापूरच्या विकासाचे शिल्पकार १) आमदारकी पासून खासदारकी २) मंत्र्यापासून मुख्यमंत्री ३) राज्यपालापासून केंद्रीय मंत्रीपदापर्यंत शिंदेसाहेबांनी उंच उंच भरारी मारुन यशोमंदिर गाठले आहे.

उपेक्षित घटकाना न्याय मिळवून देण्यासाठी महात्मा फुले, शाहू, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ते वारसा चालवित आहेत. महात्मा गांधी, पंडित नेहरु, इंदिरा गांधी यांच्या पुरोगामी समाजवादी विचाराला ते पुढे नेत आहेत. अभ्यासू व विचारशील व्यक्तीमत्व त्यातून प्रकट झाले आहे. सभ्यता व सामंजस्य आणि स्नेहभाव यांचा त्रिवेणी संगम सुशिलकुमारजी शिंदे यांच्या व्यक्तीमत्वात झालेला आहे. त्यांच्या आचार विचारातून संस्कृतीचे दर्शन घडते.

माणूस हाच एक मापदंड ठेवून दीन दलित दुबळ्या पिडीला जनसामान्यांच्या उध्दारासाठीच त्यांनी समतेचा पताका खांद्यावर घेतला आहे. त्यांनी अनेक पदे मिळवली व त्या पदापेक्षाही ते मोठे झाले आहे. परंतु त्याहीपेक्षा जनतेच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेले त्यांचे अढळपद हे ध्रुवताऱ्या सारखे आहे. भौतिक श्रीमंतीपेक्षा त्यांच्या मनाच्या निरपेक्ष श्रीमतीला त्रिवार वंदन असो.

हे साहेबांद्दल लिहित असताना उज्वला वहिनी साहेबांना विसरता येणार नाही. उज्वला वहिनीच्या ठायी असलेल्या अष्ठगुतांना विसरता येणार नाही '

ज्यांच्यामध्ये माया माधुयार्चा सागर पावित्र्याचे आगर, फुलांची कोमलता, गंगेची निर्मलता, चंद्रांची रमणीयता, सागराची अनंतता, पृथ्वीची क्षमता व पाण्याची रसना असलेल्या लक्ष्मी, सहधर्मचारिणी अर्धांगिनी असलेल्या उज्वला वहिनींमुळे त्यांचे जिवनाचे नंदनवन झाले आहे. तिच्यामुळेच उभी मंदीरे मानवतेची खरी.

'दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती' त्यांचे बिद वाक्य आहे की, माझ्या जिवनाच्या अंतिम क्षणापर्यंत मी जनतेच्या सेवेत कार्यरत राहीन म्हणूनच त्यांच्या बाबतीत म्हणावेसे वात्रे की,

The wood's are lovely
Dark & deep
But I have many Promises
To keep
& miles to go before
I sleep
"Miles togo before
I sleep"

तरी या कवितेच्या ओळी प्रमाणे त्यांना पुनश्च कार्य करण्याची संधी मिळावी हीच शुभेच्छा ईश्वर चरणी प्रार्थना. जिवेत शरदः शतम

अॅड. करिमुन्नीसा रफिक बागबान,
नोटरी भारत सरकार

मा. सुशीलकुमारजी शिंदे साहेब यांनी केलेली कामे (नवीन)

१) सोलापूर शहराच्या पाणीपुरवठा करीता एन.टी.पी.सी. च्या माध्यमातून समांतर पाण्याची पाईप लाईन करीता रुपये २५० कोटी मंजूर.

२) सोलापूर - पुणे १०० कि.मी. भिमा नगर पर्यंत रस्त्याचे ६ पदरीकरण करणेसाठी रु.१०० कोटी योजनेचे काम अंतिम टप्प्यात व सोलापूर-विजापूर रस्ता ३० कि.मी. टाकळी पर्यंत सहा पदरीकरण करणे रुपये ३२५ कोटी योजना मंजूर

३) आंतरराष्ट्रीय किर्तीचे थोर मानवतावादी सोलापूरचे 'डॉ. द्वारकानाथ कोटणीस' यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक व वस्तुसंग्रहालय पूर्ण करून जनतेसाठी खुले.

४) ज्येष्ठ नेते कर्मयोगी कै. आप्पासाहेब काडादी यांच्या कायार्चा व कतृत्वाचा गौरव म्हणून भारत सरकारचे वतीने राष्ट्रपतींच्या शुभहस्ते पोष्टाचे तिकीट प्रकाशित केले.

५) राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग व नेहरु नगर सायन्स सेंटर यांच्या माध्यमातून राष्ट्रीय 'सोलापूर विज्ञान केंद्र' निर्माण व विद्यार्थी जनतेसाठी सेवेत कार्यरत.

६) सोलापूर जवळील टाकळी येथे सी. आय.एस.एफ. चे ९० एकर जागेवर अद्यावत प्रशिक्षण केंद्र होणार.

७) सोलापूर जवळील बोरामणी येथे बी.एस.एफ.चे १५० एकर जागेवर अद्यावत प्रशिक्षण केंद्र व कॅम्प होणार.

८) हुतात्मा इंटरसिटी एक्स्प्रेसच्या जोडीला इंद्रायणी एक्स्प्रेस सुरू झाली.

९) सिद्धेश्वर एक्स्प्रेस सोबत नवीन गाडी मंजूर ८.३० वाजता सुटणार.

१०) सिव्हील हॉस्पिटल येथे भारत निर्माण योजनेतून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल (सहा विभाग) मंजूर रुपये ११० कोटी निधी लवकरच २० हजार चौ. फुट बांधकाम असलेली सहा मजली इमारत बांधणार

११) सिद्धेश्वर मंदीर परिसर 'सरोवर संवर्धन प्रकल्प' मधून रु. ८ कोटीचे काम चालू, कपौंड, गाळ, इकोपॉन्डसब, जाळी बसविणे इत्यादी.

१२) आहेरवाडी परिस्रात एन. टी.पी.सी.च्या जवळच पाच सिमेंट निर्माण कंपनीचे काम चालू.

१३) सोलापूरात भारत फोर्ज, रिलायन्स, थरमॅक्स कंपनीचे मोठे प्रकल्प मंजूरीसाठी.

१४) टाकळी येथे अद्यावत राज्य सिमा तपासणी नाका तयार व कार्यान्वीत (सर्व प्रकारच क्लिअरन्स एकाच ठिकाणी मिळणार)

१५) सोलापूर शहरात दुसऱ्या मेडिकल कॉलेजची उभारणीस मदत व सोलापूर मेडिकलहब होण्यासाठी प्रयत्नशिल.

१६) सिद्धेश्वर नंदीध्वज प्रदक्षिणा मार्गावरील इलेक्ट्रीक पोल व तारा काढून अंडरग्राऊंड केवलिंग करण्यासाठी प्रयत्नशिल.

१७) सोलापूर जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र विकास केंद्रीय पर्यटन मंत्रालयाकडून रु.४३.५० कोटी रुपये 'सोलापूर- पंढरपूर- अक्कलकोट- तुळजापूर' असे पर्यटनाचे 'मेगासकीट' निर्माण करणार


१८) केंद्र सरकारच्या अत्यंत महत्त्वाचे डायरेक्ट बेनिफीट ट्रान्सफर आप का पैसा आपके हाथ' या योजनेत सोलापूर जिल्ह्याचा समावेश होण्याकरीता प्रयत्न. दुसऱ्या टप्यात होणार (२९ प्रकारचे विविध अनुदान थेट लाभार्थी कुटुंबाच्या खात्यावर जमा होणार)

१९) सोलापूरच्या बालाजी मंदीरात तिरुपती व्यंकटेश्वर देवस्थान येथे दर्शन व राहण्याची सोय करण्याकरीता 'आरक्षण केंद्र'.

२०) जवाहरलाल नेहरु नागरी पुनर्निमाण अभियानात सोलापूरचा समावेश.

२१) सोलापूर जवळ कुंभारी येथे २००० कोटी रुपयेचा नवीन टेक्स्टाईल पार्कचे काम चालू. केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून उभारणी.

२२) रुरल इलेक्ट्रीफिकेशन अंतर्गत ग्रामीण भागातील गरीब कुटुंबियांना सिंगल फेज मोफत घर जोडणी इलेक्ट्रीक कनेक्शन दिले.



**सौ. करिमुनीसा रफिक बागबान**

# तरूणांनी नोकररीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय सुरू करावा- शिवतेजसिंह मोहिते-पाटील


**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यात फोटोग्राफी बरोबर पत्रकारीता क्षेत्रात नावाजलेले नाव म्हणजे अकलूज येथील लोहकरे यांचे फोटो अँड व्हिडीओचे संपूर्ण जिल्हात वृत्तपत्राच्या माध्यमातून सुप्रसिद्ध नाव आहे.या परिवारातील तिसरी पिढी आज या व्यवसायाच्या अधुनिक फोटोग्राफी क्षेत्रात उतरली आहे.आज येथे भव्य ऑफिसचा शुभारंभ करण्यात आला.




सोलापूर येथील विविध दैनिक वृत्तपत्रातून रंगीत छायाचित्र प्रसिद्ध करून कमी कालावधीत नाव करणारे कै. शरदराव लोहकरे,संजय शरदराव लोहकरे,राजीव शरदराव लोहकरे आणि आता केदार संजय लोहकरे यांनी अकलूजमध्ये कमी कालावधीत नावलौकिक मिळवला आहे.बातम्या आणि लोहकरे यांचे अतूट नाते निर्माण झाले आहे.नव्याने सुरू केलेल्या केदार लोहकरे फोटो अॅन्ड फिल्मस् चे उद्घाटन अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील व सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ.एम.के. इनामदार यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अकलूज नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, सामाजिक कार्यकर्ते लालासाहेब अडगळे, पत्रकार चंद्रकांत कुंभार,भारत मगर,लक्ष्मीकांत कुरूडकर, नौशाद मुलाणी, तुकाराम उबाळे (मास्तर), अकलूज शहर फोटोग्राफर संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ माने,उपाध्यक्ष कादर शेख, रणजीत एकतपुरे, शुकूर तांबोळी,जमीर तांबोळी व विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व नातलग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजकुमार मरगुरे यांना 'तपोरत्न गुणवंत शिक्षक पुरस्कार' जाहीर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने दिला जाणारा मानाचा 'तपोरत्न गुणवंत शिक्षक पुरस्कार' यंदा ज्येष्ठ व विद्यार्थीप्रिय शिक्षक राजकुमार सिद्धण्णा मरगुरे यांना जाहीर झाला आहे.



श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री तपोरत्न योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नावाने हा पुरस्कार दिला जातो. संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या संकल्पनेतून गेल्या नऊ वर्षापासून समाजातील आदर्श व गुणवंत शिक्षकांचा गौरव करण्यात येतो.पुरस्कार विजेते राजकुमार मरगुरे हे गेल्या ३१ वर्षापासून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय व निस्वार्थ सेवा बजावत आहेत. शैक्षणिक कार्याबरोबरच सामाजिक व राष्ट्रीय कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग असतो. विद्यार्थी, पालक आणि सहकारी शिक्षकांशी त्यांचे अत्यंत सलोख्याचे व आपुलकीचे संबंध असून निलम नगर परिसरात विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून त्यांचा मोठा नावलौकिक आहे. शिक्षक दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ३.०० वाजता, नेताजी शिक्षण संकुलातील तपोरत्न सभागृहात मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सपत्न िक सत्कार करण्यात येणार आहे.

अशी माहिती गुणवंत शिक्षक पुरस्कार समितीचे सदस्य मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार व मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी दिली.

# शासकीय आश्रमशाळांतील शिक्षक पदभरतीसाठी उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीस प्रारंभ

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षक संवर्गातील गट-क (अराजपत्रित) पदांच्या भरती प्रक्रियेस गती देण्यात आली असून, पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणी प्रक्रियेस आजपासून प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रक्रियेसंदभार्तील सविस्तर सूचना व वेळापत्रक नाशिक, ठाणे, अमरावती आणि नागपूर येथील अपर आयुक्त कार्यालयांकडून प्रसिद्ध करण्यात आले असून, निर्धारित वेळापत्रकानुसार कागदपत्र पडताळणी प्रक्रिया ५ सप्टेंबर पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत शासकीय आश्रमशाळांमधील पेसा व नॉन-पेसा क्षेत्रातील शिक्षक संवर्गातील एकूण २ हजार ४२१ रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने शिक्षण आयुक्तालयाकडून मुलाखतीविना निवडीसाठी पात्र ठरलेल्या प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक व उच्च माध्यमिक शिक्षक संवगार्तील एकूण १ हजार ६०० उमेदवारांची यादी आदिवासी विकास विभागास प्राप्त झाली आहे.

यामध्ये प्राथमिक शिक्षक संवगार्तील ९२७, माध्यमिक शिक्षक संवगार्तील ४२१ आणि उच्च माध्यमिक शिक्षक संवगार्तील २५२ उमेदवारांचा समावेश आहे. प्राप्त झालेल्या उमेदवारांपैकी पेसा क्षेत्रातील ४५९ तर नॉन-पेसा क्षेत्रातील १ हजार १४१ उमेदवारांचा समावेश आहे. संबंधित उमेदवारांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेसह अन्य आवश्यक मूळ कागदपत्रांची पडताळणी निर्धारित केंद्रांवर करण्यात येत आहे. विभागनिहाय पात्र उमेदवारांच्या संख्येमध्ये नाशिक विभागात सर्वाधिक ५८८ उमेदवारांचा समावेश असून, त्याखालोखाल ठाणे विभागात ४२४ उमेदवार, नागपूर विभागात २९६ उमेदवार तसेच अमरावती विभागात २९२ उमेदवार आहेत.

पडताळणी प्रक्रियेसाठी संबंधित उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर नोंदविलेल्या दाव्यांच्या पुष्ट्यर्थ आवश्यक असलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे, जाहिरातीनुसार आवश्यक असलेली कागदपत्रे तसेच प्रत्येक कागदपत्राची एक साक्षांकित (स्वयंप्रमाणित) छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य करण्यात आले आहे. उमेदवारांनी त्यांना निश्चित करून देण्यात आलेल्या दिनांक, वेळ व ठिकाणी उपस्थित राहावे. निर्धारित वेळेत अनुपस्थित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

पेसा क्षेत्रातील शिक्षक पदांसाठी प्राथमिक शिक्षक मराठी माध्यमाच्या १९६, प्राथमिक शिक्षक इंग्रजी माध्यमाच्या १६, माध्यमिक शिक्षक मराठी माध्यमाच्या ९४, माध्यमिक शिक्षक इंग्रजी माध्यमाच्या २ आणि उच्च माध्यमिक शिक्षकांच्या १५१ पदांचा समावेश आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडुरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: अॅड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# गणेश चिवटे यांच्या नेतृत्वाखाली भाजप ग्रामीण पश्चिमची पहिली आढावा बैठक संपन्न

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** भारतीय जनता पार्टी सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्याची आढावा बैठक पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माढा लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत टेंभुर्णी येथे पार पडली. भाजपा सोलापूर ग्रामीण पश्चिमचे नूतन जिल्हाध्यक्ष गणेश चिवटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीस मंडल अध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



बैठकीत पक्ष संघटन मजबूत करणे, बूथ सक्षमीकरण, पदवीधर मतदार नोंदणी, शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा प्रचार-प्रसार तसेच स्थानिक विकासकामांचा आढावा यावर चर्चा करण्यात आली. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी सक्रियपणे काम करण्याचे आवाहन केले. विकासकामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

माढा लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी ह्यगाव तिथे शाखा, बूथ तिथे भाजपाह्न या संकल्पनेनुसार प्रत्येक गाव व बूथवर संघटन मजबूत करण्याचे आवाहन केले.

जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतरची पहिलीच अधिकृत आढावा बैठक असल्याने गणेश चिवटे यांचा पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार राम सातपुते, माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार, चेतनसिंह केदार आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

गणेश चिवटे यांनी पक्षाने दिलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडत सोलापूर ग्रामीण पश्चिममध्ये भाजपाचे संघटन अधिक सक्षम व गतिमान करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी जिल्हा सरचिटणीस सचिन शिंदे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सुरजाताई बोबडे यांच्यासह मंडल अध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या सोलापूर चाप्टरचा पदग्रहण समारंभ शानदार पद्धतीने संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जैन समाजातील युवा उद्योजक व महिला उद्योजकांसाठी व्यवसाय वृद्धी व्हावी आणि नेटवर्किंगचे प्रभावी व्यासपीठ निर्माण करावे तसेच समाजातील वंचित आणि गरजू उद्योजकांना आवर्जून मदत करणे या उद्देशाने स्थापन झाले. रोम झोन जितोचे राजेंद्र जैन यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सभेत जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या सोलापूर विभागाच्या अध्यक्षपदी इंजिनिअर अभय सुराणा यांची तर सरचिटणीस पदी अमित जैन यांची एकमताने निवड करण्यात आली.

सुप्रसिद्ध गुजराती भवन मध्ये संपन्न झालेल्या या सभेत जीतो अपेक्स चे डायरेक्टर राजेश कुमार सांकला आणि जितो अपेक्स चे अध्यक्ष विजय भंडारी उपस्थित होते. सोलापुरात जितो चॅप्टर सुरू करण्यासाठी अनेक



वषार्पासून सुरू असलेल्या प्रयत्नांना आता मूर्त स्वरूप मिळालेले आहे यामुळे सोलापूरच्या उद्योजकांची निश्चितच भरभराट होऊन जगातला एक प्रभावी व्यासपीठ म्हणून पाहिले जात आहे.

जीतो म्हणजेच जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनचे इतर पदाधिकारी याप्रमाणे अशीत पंचमीया, सचिन भस्मे अनुक्रमे उपाध्यक्ष तसेच अमित कुमार जैन सरचिटणीस तसेच धीरज बलदोटा साहिल भंडारी प्रवीण वाणीगोता जॉइंट सेक्रेटरी तसेच प्रतीक शाह, महावीर कवाड, अक्षय शिंगवी, पुष्कराज कोठारी, अभय गांधी हे सदस्य असा एकूणच मोठा डायरेक्ट बोर्ड ऑफ डायरेक्टर ग्रुप तयार करण्यात आलेला आहे.

तसेच या सभेमध्ये जितो च्या युवा विंगचे देखील निवड करण्यात आली यामध्ये चेअरमन म्हणून विनीत शाह, व्हाईस चेअरमन खुशी सुराणा, अभिषेक शाह यांच्या अनुक्रमे तर सरचिटणीस पदी यश जैन तसेच जीतो लेडीज विंगचे देखील या वेळी निवड करण्यात आली चेअरमन पदी आरती सुराणा, व्हाईस चेअरमन तेजल पोरवाल आणि जनरल सचिव पिंकी कवाड,

बिझनेस वैद एथिक्स अँड कम्युनिटी सर्विस या विचारातून जीतो कार्यरत असून त्याची स्थापना 2007 मध्ये झाली आज देशभर आणि परदेशात मिळून एकूण 25 पेक्षा जास्त चाप्टर सुरू आहेत त्याचे एकूण 90 हजार पेक्षा जास्त उद्योजक व्यावसायिक सदस्य म्हणून जोडले गेलेले आहेत जितोच प्रमुख उद्देशच हा आहे की प्रत्येक सदस्याचा व्यवसाय वृद्धी होऊन आर्थिक सक्षम व्हावा आणि समाजातील वंचित घटक देखील जोडला जाऊन त्याची व्यवसाय वृद्धी व्हावी आणि तो मुख्य प्रवाहात यावा असा आहे.

# शिक्षक मतदार संघासाठी मंगेश चिवटे यांनाच महायुतीची उमेदवारी द्यावी

## एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेची मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीसाठी महायुतीने मंगेश चिवटे यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.




मंगेश चिवटे हे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्नांसाठी सातत्याने कार्यरत आहेत. शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी तसेच प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला असल्याने पुणे विभागातील शिक्षकांमध्ये त्यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक वातावरण असल्याचे आडसूळ यांनी सांगितले.

जुनी पेन्शन योजना, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, अनुदानित शाळांच्या समस्या, वेतन व सेवाविषयक प्रश्न, शिक्षकांची सुरक्षितता तसेच शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक मुद्द्यांवर सक्षमपणे आवाज उठविणाऱ्या नेतृत्वाची गरज आहे. पुणे विभागीय शिक्षक मतदारसंघातील विविध शिक्षक व कर्मचारी संघटना, पदाधिकारी, शिक्षक प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांकडून चिवटे यांच्या उमेदवारीला वाढता पाठिंबा मिळत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. शिक्षकांच्या प्रश्नांची जाण, प्रशासनाशी समन्वय साधण्याची क्षमता आणि हक्कांसाठी संघर्षाची भूमिका यामुळे चिवटे हे सक्षम उमेदवार असल्याचे सांगत महायुतीने त्यांच्या कार्याची दखल घेऊन उमेदवारी द्यावी, अशी मागणी आडसूळ यांनी केली.

या पत्रकार परिषदेस वैभव शेटे, जुबेर हिप्परगी, उमेश कल्याणी, रतिलाल डोंगरे , एजाज शेख आदी उपस्थित होते.

# कचरा डेपो बाबत अकलूज नगर परिषदेचा निर्णय अगोदरच भाजपा पदाधिकाऱ्यांची फुकटचे श्रेय घेण्यासाठी स्टंटबाजी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** ग्रामदैवत अकलाई देवीचा परिसर आणि नीरा नदीपात्राच्या स्वच्छतेबाबत अकलूज नगरपरिषदेने आधीच वैधानिक निर्णय घेऊन काम मार्गी लावलेले असताना, आयत्या पिठावर रेघोट्या मारत भाजप पदाधिकाऱ्यांनी सुरू केलेली घाणेरडी राजकीय स्टंटबाजी आता चव्हाट्यावर आली आहे. नगरपरिषदेने अधिकृत सभेत निर्णय झाला असताना भाजपचे पदाधिकारी अचानक जागे झाले आणि कॅमेऱ्यासमोर उभे राहून ह्यअकलूज भकास झालेह्न असा आव आणत जनतेची डोळ्यात धूळफेक करत असल्याचा आरोप सत्ताधाऱ्यांकडून होताना दिसत आहे.




प्रत्यक्षात सत्ताधाऱ्यांनी हा प्रश्न अगोदरच गांभीयार्ने हाताळून २५ ऑगस्ट २०२६ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. ३ अन्वये कचरा डेपोसाठी खासगी जागा भाडेतत्त्वावर घेण्याचा ठराव विषयपत्रिकेवर ठेवला होता. त्या दिवशी महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियम १९६५ च्या कलम ८१(९) नुसार आवश्यक गणपूर्तीअभावी नगराध्यक्षा सौ. रेश्मा अडगळे यांनी सभा तहकूब केली आणि ३१ ऑगस्टच्या तहकूब सभेत हा ठराव सवार्नुमते मंजूरही करून घेतला.

सत्ताधाऱ्यांनी घनकचऱ्याच्या समस्येवर कायदेशीर तोडगा काढून शहराच्या हिताचा निर्णय पदरात पाडून घेतल्यानंतर, भाजपच्या मंडळींना अचानक अकलाई देवीच्या परिसराचा पुळका आला आणि त्यांनी समाजमाध्यमांवर कचऱ्याचे व्हिडिओ व्हायरल करत नगरपरिषद काहीच करत नसल्याचे बकवास चित्र रंगवण्यास सुरुवात केली. हा जनतेच्या प्रश्नांचा पुळका नसून नगरपरिषदेच्या कामाचे फुकट श्रेय लाटण्यासाठी केलेली निव्वळ लाचार आणि उशिराची राजकीय नौटंकी आहे, अशी संतप्त चपराक स्थानिक नागरिकांनी लगावली आहे. सध्या शहरात भूमिगत गटार, पाणीपुरवठा आणि दजेर्दार सिमेंट रस्त्यांची कामे वेगाने सुरू असताना, त्याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करून संपूर्ण शहराला बदनाम करण्याचा हा भाजपचा कुटील डाव उघडा पडला आहे.

केंद्रात आणि राज्यात भाजपचीच सत्ता आहे, जिल्ह्याला पालकमंत्रीही भाजपचाच लाभला आहे; मग या पदाधिकाऱ्यांनी गेल्या १२ ते १४ वर्षांत नेमके काय दिवे लावले? याचा हिशोब कागदपत्रांसह जनतेसमोर ठेवून दाखवावा, असे थेट आव्हान आता भाजपला देण्यात आले आहे.

सत्ताधाऱ्यांनी निर्णय घेतल्यावर तोंडावर कॅमेरे धरून पोकळ भाषणे ठोकता, ही कसली लोकसेवा? अकलूजची जनता दूधखुळी नाही; कोण कागदावर अधिकृत निर्णय घेऊन प्रत्यक्षात घाम गाळतोय आणि कोण कामाचे श्रेय लाटायला उकिरड्यावर उभे राहून रील्स बनवतोय, हे जनतेला चांगले ठाऊक आहे. त्यामुळे असल्या छुप्या राजकीय स्टंटबाजीने अकलूजकरांची दिशाभूल करण्याचे उद्योग भाजपने त्वरित थांबवावेत, असा सज्जड इशारा दिला जात आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्र/कवि/अभि/ /२०२६ नि.

**मोहोळ येथील मा. तहसिलदार सो.यांचे कोर्टात**

श्री.भीमराव कोंडीबा राऊत
वय-५५वर्षे, धंदा-मजूरी,
रा. पाटकुल, ता. मोहोळ, जि. सोलापूर } अर्जदार

**विरुध्द**

ग्रामपंचायत पाटकुल,
ता. मोहोळ, जि. सोलापूर
(अर्जाची नोटीस ग्रामसेवक पाटकुल,
ता. मोहोळ, यांचेवर बजाविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्या अर्थी वर नमुद अर्जदार यांची आई सुलोचना कोंडीबा राऊत यांचा मृत्यु दि.०१/०६/२०२५ रोजी अर्जदार यांचे राहते घरी मौजे पाटकुल, ता. मोहोळ येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांचेकडे अर्जदार यांच्या आईच्या मृत्युच्या दाखल्याची दि.१८/०८/२०२६ रोजी प्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यानी त्यांच्याकडील ०१/१६/२०२५ चे अभीलेखात अर्जदार याची आई सुलोचना कोंडीबा राऊत हिच्या मृत्युची नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला.

त्याअर्थी सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला यांचेकडील अभिलेखात अर्जदार यांच्या आईच्या मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होण्यासाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप /हरकत असल्यास दि ३०/०९/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिध्द केल्यापासून १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलांमार्फत मे. कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे, मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे.

ता.१०/०९/२०२६

लिपीक (शिक्का) तहसिलदार मोहोळ

# टेंभूर्णीत हजारो युवकांचे उपस्थितीत अण्णाभाऊ साठेंची जयंती उत्साहात साजरी

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी ता माढा येथे मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळ व सकल मातंग सामाजाचे वतीने साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांचे जयंतीनिमित्त ३१ रोजी शहरातून प्रतिमेची सवाद्य मिरवणूकीने उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी हरारो अण्णाभाऊ प्रेमींनी अण्णाभाऊंचा जयजयकार करण्यात आला.

टेंभूर्णी येथील ग्रामपंचायत कार्यालया समोरून मिरवणुकीची सुरूवात अण्णाभाऊंच्या प्रतिमेस करमाळा-माढ्याचे मा.आमदार संजयमामा शिंदे व जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक राजाभाऊ थोरात, माजी सरपंच प्रमोद कुटे, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष सुरज देशमुख, यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून मीरवणूकिस सुरुवात करण्यात आली. यावेळी शिवसेना माढा तालुका प्रमुख मधुकर देशमुख, उपतालुकाप्रमुख सुरेश लोंढे, प्रहारचे संपर्क प्रमुख अमोल जगदाळे, पं.स.सदस्य प्रतिनिधी परमेश्वर खरात, मा.पं.स.सदस्य सिद्राम आरडे, मा.ग्रा.पं. सदस्य बाळासाहेब देशमुख, बंकट गायकवाड, स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष चंद्रकांत कुटे, बहुजन मुक्ती पार्टीचे महेंद्र सोनवणे, यांचेसह विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक उपस्थित होते.यावेळी आकर्षक सजावट केलेल्या ट्रालीतून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे पुतळ्याची शहरातील प्रमुख मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली.यामध्ये हलगी, बँड, बँजो घ्या तालावर हजारो युवक, महिला व नागरीकांनी ठेका धरून व अण्णाभाऊंचा जयजयकार करीत मिरवणूक संपन्न झाली.यावेळी ॲड. तुकाराम राऊत यांनी अण्णाभाऊंच्या जीवनचरीत्रावरील ५०० पुस्तके वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मातंग एकता आंदोलन चे जिल्हाध्यक्ष रामभाऊ वाघमारे, सतीश जगताप, रोहित आरडे, जयंती मंडळाचे अध्यक्ष विशाल जगताप, शेखर जगताप, रोहित सिद्धाराम आरडे, शुभम राजू कांबळे, अक्षय जगताप, रंजीत जगताप, योगेश दाखले, यशवंत महादेव जगताप, अक्षय जगताप, दादा जगताप, धनराज वाघमारे, आदित्य धडे, रील स्टार पवन जाधव, संतोष सोनवणे, रवी सोनवणे, कैलास जगताप, सचिन थोरात, निलेश तुपसौंदर, विनोद जगताप, शहाजी शेलार, शाहु कांबळे, रणजित जगताप, नागेश जगताप, सागर कांबळे, दादा केंदळे, अण्णा जगताप, अक्षय जगताप, अजय आरडे, रवी खंदारे, गणेश जगताप, यश धडे, शुभम कांबळे, मामा मोरे, प्रथमेश दाखले, ऋषिकेश वाघमारे, बाबा जगताप, विकी जगताप, रंजीत मोरे, आप्पासाहेब कसबे, आदिंनी परिश्रम घेतले.

# पेनुरचे श्रीकांत माने यांची वाहतूक नियंत्रकपदी पदोन्नती



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** पेनुर (ता. मोहोळ) येथील रहिवासी तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) गेल्या २६ वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावणारे श्रीकांत माने यांची पंढरपूर आगारात वाहतूक नियंत्रक म्हणून पदोन्नती झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पेनुर ग्रामस्थ, मित्रपरिवार व हितचिंतकांच्या वतीने जंगी स्वागत करून सत्कार करण्यात आला.

श्रीकांत माने यांनी आपल्या सेवाकाळाची सुरुवात वाहक म्हणून केली. गेल्या २६ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी एसटी महामंडळाच्या माध्यमातून प्रवाशांना सुरक्षित व विश्वासार्ह सेवा देण्यासाठी योगदान दिले. दीर्घ सेवेनंतर त्यांच्या कायार्ची दखल घेत त्यांना वाहतूक नियंत्रक या जबाबदारीच्या पदावर पदोन्नती मिळाली आहे. पंढरपूर येथे नवीन जबाबदारी स्वीकारताना त्यांच्या अनुभवाचा निश्चितच महामंडळाला फायदा होणार असून वाहतूक व्यवस्थापन अधिक सुरळीत करण्यासाठी ते योगदान देतील, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

दरम्यान पदोन्नती निमित्त भाजपाचे मोहोळ तालुका अध्यक्ष रमेश माने व युवा उद्योजक सागर चवरे यांनी त्यांचा सन्मान केला. यावेळी युवा नेते रणजीत चवरे, भैरवनाथ चवरे, कैलास माने, तानाजी सावंत आदीसह कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.


## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. **9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने** मो. 9353370779
**रेखा बर्वे** मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | | ४ | ५ | ■ | ६ | | ७ | ८ |
| | ■ | ९ | | ■ | १० | | ■ | | ■ | ११ | |
| १२ | | | | ■ | ■ | १३ | | | ■ | ■ | |
| | ■ | ■ | १४ | १५ | १६ | ■ | ■ | | ■ | १७ | |
| ■ | १८ | | ■ | १९ | | ■ | २० | | | | ■ |
| २१ | | ■ | २२ | | | ■ | २३ | | ■ | ■ | २४ |
| ■ | २५ | | | | ■ | २६ | | | | | ■ |
| २७ | ■ | ■ | २८ | | ■ | | ■ | | ■ | ■ | २९ |
| ३० | ३१ | | ■ | ■ | ३२ | | | | ■ | ३३ | |
| ३४ | | ■ | ३५ | | | | ■ | ३६ | | | |
| ३७ | | ३८ | | ■ | ■ | ३९ | ४० | | ■ | ४१ | |
| ■ | ■ | ४२ | | | ■ | ■ | | ■ | ४३ | | ■ |

**आडवे शब्द :** १) भाजपमधून राष्ट्रवादी पक्षात आलेले राज्यातील एक ज्येष्ठ नेते
६) शिवशंकराचे एक नाव
९) रव्यापासून बनविलेला गरा १०) वर उलट लिहा
११) पृथ्वी, पातळ कालवण १२) पटकन, त्वरेने
१३) केर *** १४) एक दाक्षिणात्य राजकारणात प्रवेश केलेला अभिनेता-*** हसन १७) शिजवलेला तांदूळ १८) दुर्ग, किल्ला
१९) पाच दुणे २०) रायगड जिल्ह्याचे मुख्यालय असलेले शहर
२१) बे दुणे २२) इनाम म्हणून मिळालेली जमीन २३) वखा उलट लिहा
२४) शंभर (हिंदीत) २५) जुन्या मराठी चित्रपटातील अभिनेता-रवींद्र ****
२६) हे कॅलेंडर प्रसिध्द आहे २८) सन उलट लिहा
३०) राशीचक्रातील एक रास ३२) दूध आणि केळीचे मिश्रण
३३) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३४) गुलाम
३५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो ३६) सैन्याचा प्रमुख
३७) मग्न, लीन ३९) कागदाचा चर्तुथांश स्तंभ, कॉलम
४१) बुटाची दोरी ४२) प्रश्न (हिंदीत)
४३) या प्राण्याला वाळवंटातील जहाज म्हणतात

**उभे शब्द :** १) द्रोणाचार्यांचा पुतळा समोर ठेवून धनुर्विद्या शिकणारा धनुर्धर
२) भुजबळ या जिल्ह्यातून विधानसभेवर निवडून गेले आहेत
३) अंगावर शहारे आणणारे असे
४) भीती (हिंदीत)
५) नोकर ६) राज ठाकरे यांचा पक्ष
७) उशीर (हिंदीत)
८) कॉलनी (मराठीत)
१५) कामात मदत करणारा
१६) एक म्हण-*** तोंडी मोठा घास
१७) कपाळ १८) उष्ण
२०) पूर्वी पाणी आणण्यासाठी वापरली जायची ती चामड्याची मोठी गोण
२२) बोझा, भार
२६) खर्चात केलेली बचत २७) विधानसभेवर निवडून दिला जाणारा लोकप्रतिनिधी २९) पंधरा आणि सोळा मिळून होणारी संख्या
३१) शपथ (हिंदीत)
३२) होता जिवा म्हणून वाचला **
३३) माशाचा एक प्रकार
३५) जंगलात लागलेली आग
३८) महिना, माह
४०) बदामाप्रमाणे सुक्या मेव्यातील एक घटक

## सुडोकु - 45

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 2 | 1 | | 7 | | | 6 |
| | 4 | | | | 6 | | | |
| 1 | 9 | | | | 4 | 7 | | 3 |
| | 7 | 8 | 4 | | | | 6 | 2 |
| | | 9 | 7 | | 3 | | 8 | 5 |
| | | | | 2 | | 3 | | 4 |
| | | 4 | 6 | | 2 | | | 1 |
| 2 | 5 | | 8 | | 1 | 6 | | |
| | 1 | 3 | | | 9 | | 2 | |


माजी केंद्रीय गृहमंत्री
मा.श्री.
सुशीलकुमार शिंदे साहेब
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..!
"पाऊले चालती तुमची पुढे,
कीर्तीचा चौघडा वाजे चोहीकडे"
सौ. करिमुनीसा
रफिक बागबान
ॲडव्होकेट, नोटरी- भारत सरकार
ॲड अमीर
रफिक बागबान
शुभेच्छुक:-
नागेश दुस्सा, मुमताज तांबोळी,
प्रमिला तुपलवंडे


आशीर्वाद
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा..!
मा. विधानपरिषद सदस्य
मा. श्री. प्रशांत
(मालक) परिचारक
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:-
शिवकृपा सप्लायर
प्रो प्रा. अमोल बनसोडे
आमचेकडे पाणी टँकर,
डंपिंग ट्रॅक्टर, जे.सी.बी.,
रोड रोलर योग्य दरात
भाड्याने मिळेल.
मु. पो. कोर्टी,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर


मा. विधानपरिषद सदस्य
आशीर्वाद
मा. श्री.
प्रशांत (मालक)
परिचारक
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
आपणास उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य,
यश, कीर्ती आणि समृद्धी लाभो,
हीच सदिच्छा!
शुभेच्छुक:-
विठ्ठल लोखंडे मित्रपरिवार व
कट्टर परिचारक प्रेमी, पंढरपूर
मा. श्री. विठ्ठल लोखंडे


आशीर्वाद
मा. विधानपरिषद सदस्य
मा. श्री. प्रशांत
(मालक) परिचारक
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:-
मा.श्री. अजमेर शेख
ए. जे. एस कंपनी व्हेजिटेबल अँड फ्रुट्स कंपनी, कोर्टी
प्रोप्रा, अजमेर शेख, शिराज शेख
AJS
COMPANY


आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा..!
मा. विधानपरिषद सदस्य
मा. श्री. प्रशांत
(मालक) परिचारक
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:-
मा. श्री. दादासाहेब लवटे
माजी उपसरपंच
दादासाहेब लवटे मित्र मंडळ, कोर्टी
जय भवानी नवरात्र तरुण मंडळ लवटे वस्ती गारमाळ, कोर्टी


मा. प्रशांतराव
(मालक)
परिचारक
आपणास वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
मा. श्री. विवेक
उर्फ रघु पवार
शुभेच्छुक:-
रघु भाऊ मित्र व सर्व ग्रामस्थ मंडळी, कोर्टी
R.P. ग्रुप कोर्टी


मा. विधानपरिषद सदस्य
मा. प्रशांतराव
(मालक)
परिचारक
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा !
मा. श्री. बापू मिसाळ सर
मा. श्री. रामभाऊ मिसाळ
माजी सरपंच
शुभेच्छुक:-
रामभाऊ मिसाळ मित्र मंडळ व सर्व ग्रामस्थ मंडळी कोर्टी


आशीर्वाद
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा..!
मा. विधानपरिषद सदस्य
मा. श्री. प्रशांत
(मालक) परिचारक
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:-
मा. श्री. प्रोप्रा. दादासाहेब वाघमारे
गुरुकृपा कृषी सेवा केंद्र, कोर्टी


आशीर्वाद
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा..!
मा. विधानपरिषद सदस्य
मा. श्री. प्रशांत
(मालक) परिचारक
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:-
मा. श्री. पंडित (दादा) शेंबडे
संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर
पंडित दादा शेंबडे मित्रपरिवार
भदुंबरे प्रशांत वीटउद्योग भदुंबरे


आशीर्वाद
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा..!
मा. विधानपरिषद सदस्य
मा. श्री. प्रशांत
(मालक) परिचारक
आपणांस
वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक:-
मा. श्री. भास्कर (दादा) कसगवडे
भाजपा तालुकाध्यक्ष